मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 23 एप्रिल 2025 | पान- 1

# पिंपरी महापालिकेला दहा लाखांचे पारितोषिक

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांना पारितोषिक प्रधान

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा' अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेस कर संकलन वाढीसाठी केलेल्या विविध उपाय योजनांमध्ये महापालिका अव्वल ठरली असून, या पुरस्काराअंतर्गत १० लाख रुपयांचे पारितोषिक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांना हे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

मुंबई येथील सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या नागरी सेवा दिन २०२५ आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२३-२४ व २०२४-२५ पारितोषिक प्रदान समारंभात हे पारितोषिक देण्यात आले.

पिंपरी चिंचवड महापालिकेने मालमत्ता कर संकलन वाढीसाठी राबविलेले नवोपक्रम, ऑनलाईन सुविधा, मालमत्ता जप्ती लिलाव, जिओ सिक्वेन्सिंग, यू. पी. आय. सी. आयडी आदी प्रस्तावांमध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी राज्याच्या कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यशदाचे अतिरिक्त महासंचालक राहुल महिवाल, पिंपरी चिंचवड पालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागांचे, जिल्ह्यांचे, महापालिकांचे प्रशासकिय अधिकारी आणि कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

राज्यस्तरीय समितीने महानगरपालिकेकडून प्राप् झालेल्या प्रस्तावाची सखो ल छाननी करून ही निव ड केली. मालमत्ताकरवाढीसाठी महानगरपालिकेने राबवलेले उपक्रम, प्रशासनातील पारदर्शकता, तांत्रिक साधनांचा वापर, लोकसहभाग वाढवण्याचा प्रयत्न आणि उत्तम कार्यप्रणाली हे सर्व पैलू यामध्ये महत्वाचे ठरले.



### मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

### 'रिक्षात पुरुष प्रवासी बसल्यास फोटो काढा'

करसंकलनामध्ये विक्रमी वाढ
- » २०२१-२२ : ६२८ कोटी रुपये
- » २०२२-२३ : ८१६ कोटी रुपये
- » २०२३-२४ : ९७७ कोटी रुपये (यापैकी ५५४ कोटी रुपये ऑनलाइन भरणा)

" बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका

# आमदार सुनील शेळके यांच्या 'जनता दरबार' उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शासकीय विश्रामगृहाच्या आवारात आयोजित होणाऱ्या या दरबारात मावळ तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपल्या समस्या मांडण्यासाठी येतात.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्याचे आमदार सुनील शेळके यांच्या जनता दरबार या उपक्रमाला गेल्या साडेपाच वर्षांपासून सातत्याने प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. दर सोमवारी वडगाव मावळ येथील शासकीय विश्रामगृहाच्या आवारात आयोजित होणाऱ्या या दरबारात मावळ तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपल्या समस्या मांडण्यासाठी येतात.



आज आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात नागरिकांनी विविध प्रकारच्या समस्या आमदारांसमोर मांडल्या. यामध्ये प्रामुख्याने पायाभूत सुविधांशी संबंधित तक्रारींचा समावेश होता. खराब रस्ते, गटारांची अकार्यक्षमता, पाणीपुरवठ्यातील अडचणी तसेच बंद असलेल्या स्ट्रीटलाईट्सबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

घरकुल योजनांत अपात्र ठरणे, परवानग्यांमध्ये होणारा विलंब, तसेच बेकायदेशीर बांधकामांबाबत कारवाईची मागणीही करण्यात आली. आरोग्य सेवा सुधारण्याची गरज, औषधांचा तुटवडा, तसेच आरोग्य शिबिरांच्या आयोजनाची मागणी याही नागरिकांनी यावेळी स्पष्टपणे मांडल्या.

शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या कमतरतेकडे लक्ष वेधले गेले, तर शिष्यवृत्तीसंबंधी तांत्रिक अडचणी आणि शाळा-महाविद्यालयांच्या सुविधांमध्ये सुधारणा व्हावी, अशी मागणी झाली. पोलिस प्रशासनाकडून होणारे दुर्लक्ष, गुन्हेगारी वाढ, घरफोडी व चोरीसारख्या घटनांविषयीही नागरिकांनी चिंता व्यक्त केली.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी, पात्र असूनही नाव न येणे किंवा लाच मागितल्याच्या घटना याही निदर्शनास आणून देण्यात आल्या. वयोवृद्ध, अपंग व विधवा नागरिकांनी निवृत्तीवेतन, आधार कार्डातील त्रुटी, व बँक खात्यांशी संबंधित अडचणी मांडल्या.

रोजगाराच्या संधींचा अभाव, स्वयंरोजगारासाठी कर्ज मिळण्यात अडथळे, तसेच जमिनीच्या मालकीहक्क, हस्तांतरण व वादासंबंधी तक्रारी देखील मांडण्यात आल्या. सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधा अपुऱ्या असल्याने प्रवाशांना होणाऱ्या त्रासाबाबतही नागरिकांनी आवाज उठवला.

या लोकोपयोगी आणि लोकाभिमुख उपक्रमामुळे आमदार सुनील शेळके यांची सर्वसामान्य जनतेशी असलेली नाळ अधिक दृढ झाली आहे. लोकांशी थेट संवाद, पारदर्शकता आणि कामाचा सातत्यपूर्ण प्रयत्न या तीन आधारस्तंभांवर उभा असलेला जनता दरबार हा मावळ तालुक्यात लोकप्रतिनिधित्वाचा आदर्श ठरतो आहे.

# 'पिंक ई- रिक्षा'ला लवकरच पूरक सेवेचा दर्जा : उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

**महिला व बाल विकास विभागाच्यावतीने जिल्ह्यातील चार हजार महिलांना पिंक ई- रिक्षाचे वितरण कृषी महाविद्यालय येथे करण्यात आले.**

पुणे | प्रतिनिधी

'पिंक ई- रिक्षा' सेवेला मिळणारा प्रतिसाद पाहून या सेवेला पूरक सेवेचा (फिडर सर्व्हिस) दर्जा देण्यात येणार आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला (महामेट्रो) पूरक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभागाशी करार केला जाणार असून राज्यातील सर्व विमानतळे आणि पर्यटन स्थळांवरही ही सुविधा पुरविली जाणार आहे.' अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

महिला व बाल विकास विभागाच्यावतीने जिल्ह्यातील चार हजार महिलांना पिंक ई- रिक्षाचे वितरण कृषी महाविद्यालय येथे करण्यात आले. त्यावेळी पवार बोलत होते. कार्यक्रमाला कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, विभागाच्या आयुक्त नयना गुंडे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील ६० लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला

पवार म्हणाले, 'महिला सक्षमीकरण आणि सुरक्षिततेच्यादृष्टीने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून महिलांना रोजगार निर्मिती, आर्थिक सक्षम, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात पुणे, नाशिक, नागपूर, अहल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आणि कोल्हापूर या आठ शहरांत दहा हजार रिक्षा वितरित करण्यात येणार आहेत.'

पिंक ई- रिक्षा योजनेमुळे पुरुषांचा रोजगार बुडणार नाही, याची काळजी घेण्यात येईल. त्यादृष्टीने या योजनेचा टप्प्याटप्प्याने प्रसार करण्यात येईल.' असे पवार म्हणाले. 'महायुती सरकार लाडक्या बहिणींच्या पाठिशी आहे. काही जण 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना बंद करणार, संविधान बदलणार असा अपप्रचार करत आहेत. मात्र, राज्यातील लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये सन्मान निधी दिला जातो. कोणत्याही परिस्थितीत लाभार्थी महिलांचा सन्मान निधी बंद होऊ दिला जाणार नाही.' असे पवार यांनी सांगितले. महिलांनी त्यांच्या रिक्षात ग्राहक म्हणून पुरुष बसल्यास त्यांचे फोटो काढून घरी पाठवावे. यातून सुरक्षितता आणि समाजातील विकृतींना आळा बसेल. पोलीस यंत्रणेलाही याचा उपयोग होईल. परिवहन मंत्र्यांशी चर्चा करून या निर्णयाबाबत लवकरच परिपत्रक काढण्यात येईल.' असे पवार यांनी सांगितले.




### सन्मान निधी बंद होऊ दिला जाणार नाही

» 'महायुती सरकार लाडक्या बहिणींच्या पाठिशी आहे. काही जण 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना बंद करणार, संविधान बदलणार असा अपप्रचार करत आहेत. मात्र, राज्यातील लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये सन्मान निधी दिला जातो. कोणत्याही परिस्थितीत लाभार्थी महिलांचा सन्मान निधी बंद होऊ दिला जाणार नाही.' असे पवार यांनी सांगितले.

### 'रिक्षात पुरुष प्रवासी बसल्यास फोटो काढा'

» सुरक्षिततेसाठी महिला ग्राहकांनी रिक्षाने जाताना 'पिंक ई-रिक्षाला प्राधान्य द्यावे. रिक्षाचालक महिलांनी त्यांच्या रिक्षात ग्राहक म्हणून पुरुष बसल्यास त्यांचे फोटो काढून घरी पाठवावे. यातून सुरक्षितता आणि समाजातील विकृतींना आळा बसेल. पोलीस यंत्रणेलाही याचा उपयोग होईल. परिवहन मंत्र्यांशी चर्चा करून या निर्णयाबाबत लवकरच परिपत्रक काढण्यात येईल.' असे पवार यांनी सांगितले.

### पुढील अर्थसंकल्पात तरतूद

» 'पुण्यातील मेट्रोला पूरक सेवा उपलब्ध करून देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालकांसोबत चर्चा करण्यात आली असून, त्यांच्याकडून करारासाठी सहमती दर्शविण्यात आली आहे. या योजनेला महिलांकडूनही चांगला प्रतिसाद अपेक्षित आहे. प्रतिसाद मिळाल्यास अन्य जिल्ह्यांतील लोकसंख्येचा विचार करून पुढील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल.' असे पवार यांनी स्पष्ट केले.

# 'पीएमपी'त आता वाहकही कंत्राटी, दोन हजार चालक आणि वाहक कंत्राटी पद्धतीने भरण्यास सहमती

**कंत्राटी पद्धतीने 400 बस सेवेत दाखल करण्यात येणार असताना एक हजार चालकांबरोबर एक हजार वाहकांचीही सेवा घेतली जाणार आहे.**

पुणे | प्रतिनिधी

पुणे महानगर परिवहन महामंडळामधील (पीएमपीएमएल) कंत्राटदारांच्या बससोबत केवळ चालकांची सेवा घेतली जात असताना आता वाहकही कंत्राटी पद्धतीने सेवेत घेतले जाणार आहे. त्यानुसार कंत्राटी पद्धतीने (भाडेतत्त्वावर) ४०० बस सेवेत दाखल करण्यात येणार असताना एक हजार चालकांबरोबर एक हजार वाहकांचीही सेवा घेतली जाणार आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील 'जीवनवाहिनी' असलेल्या 'पीएमपी' प्रशासनात अनेक वर्षांपासून अंतर्गत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्यातच 'पीएमपी'च्या ताफ्यात एक हजार ६०० नवीन बस दाखल करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात ६०० बस दाखल करून घेण्याचे नियोजन केले असून भाडेतत्त्वावरील ४००, तर स्वमालकीच्या २०० बसचे नियोजन आहे

त्यापैकी भाडेतत्त्वावरील १४६ बस ताफ्यात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यातच 'पीएमपी'मध्ये मनुष्यबळाची कमतरता असताना प्रशासनाकडून भाडेतत्त्वावरील कंत्राटदारांकडूनच दोन हजार मनुष्यबळ सेवेत दाखल करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे यामध्ये एक हजार वाहकही कंत्राटी पद्धतीने सेवेत घेतले जाणार आहे. यापूर्वी कंत्राटदारांकडून केवळ चालकच उपलब्ध करून दिले जात होते.



### जुनी पद्धत काय ?

» 'पीएमपी'मध्ये कंत्राटी पद्धतीने बससेवा घेण्यास सुरुवात झाल्यापासून कंत्राटदारांकडून बसबरोबर चालकही उपलब्ध करून देण्यात येत असे. वाहक 'पीएमपी' प्रशासनाकडून भरती प्रक्रियेद्वारे नियुक्त करून नेमले जायचे. आता वाहकांची सेवाही कंत्राटदारांकडून उपलब्ध करून देण्यात सहमती दर्शविली आहे.

> 'पीएमपी'मध्ये नव्याने बस दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. कंत्राटदारांच्या १४६ बस ताफ्यात दाखल झाल्या असताना मनुष्यबळाची कमतरता भासू नये म्हणून चालकांबरोबर वाहक असे दोन हजार चालक-वाहक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यांच्याकडूनच या बसच्या संचलनाचे नियोजन केले जाणार आहे. नवीन भरती प्रक्रिया तूर्तास होणार नाही.
>
> - नितीन नार्वेकर, सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल

# पिंपरी चिंचवड भाजप संघटन पर्वात 14 मंडल अध्यक्षांची निवड

## शहरात पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) संघटनेच्या नवीन पर्वात १४ मंडल अध्यक्षांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे पिंपरी चिंचवड शहरातील भाजप संघटनेला नवी ऊर्जा मिळाली असून, शहरात पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला आहे.

चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीन विधानसभा मतदारसंघांतील १४ मंडलांसाठी नवीन अध्यक्षांची निवड रविवारी जाहीर करण्यात आली आहे. आमदार शंकर जगताप यांनी विधानसभा निहाय आयोजित कार्यक्रमांमध्ये नवनियुक्त मंडल अध्यक्षांची नावे जाहीर करून सर्वांचे अभिनंदन केले. प्राथमिक सदस्य, सक्रिय सदस्य, बूथ कमिटी यानंतर संघटन पर्वाच्या तिसऱ्या टप्प्यात मंडल अध्यक्ष यांची निवड करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील भारतीय जनता पार्टीच्या संघटनेला या निवडीमुळे एक नवीन दिशा मिळेल, तसेच, नवीन अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक मजबूत होईल आणि जनतेच्या समस्यांवर अधिक प्रभावीपणे काम करेल, अशी आशा भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, शितल शिंदे, शैलाताई मोळक, माजी महापौर नितीन काळजे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, मोरेश्वर शेडगे, संतोष कलाटे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, बाबासाहेब त्रिभुवन, शेखर चिंचवडे, सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, प्रसाद कस्पटे, बिभीषण चौधरी, दीपक भोंडवे, संकेत चोंधे, राजेंद्र बाबर, निलेश अष्टेकर, कैलास सानप, विजय शिनकर, नंदू भोगले आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विधानसभा निहाय आयोजित कार्यक्रमांमध्ये नवनियुक्त मंडल अध्यक्षांची नावे जाहीर करून सर्वांचे अभिनंदन केले. प्राथमिक सदस्य, सक्रिय सदस्य, बूथ कमिटी यानंतर संघटन पर्वाच्या तिसऱ्या टप्प्यात मंडल अध्यक्ष यांची निवड करण्यात आली आहे.

### पिंपरी विधानसभा मतदारसंघ

- मोहन राऊत (रावेत – वाल्हेकरवाडी)
- हर्षद नढे (चिंचवड-काळेवाडी)
- सोमनाथ तापकीर (रहाटणी – पिंपळे सौदागर)
- सनी बारणे (थेरगाव – वाकड)
- गणेश ढोरे (सांगवी – पिंपळे गुरव)

### पिंपरी विधानसभा मतदारसंघ

- जयदीप खापरे (प्राधिकरण – चिंचवड)
- धरम वाघमारे (आकुर्डी गाव- शाहूनगर)
- मंगेश धाडगे (संत तुकाराम नगर – खराळवाडी – कासारवाडी)
- अनिता वाळुंजकर (फुगेवाडी-दापोडी-बोपखेल

### भोसरी विधानसभा मतदारसंघ

- ऍड. योगेश सोनवणे (चिखली – कृष्णानगर)
- रामदास कुटे (तळवडे – यमुनानगर)
- अजित बुर्डे (मोशी – चऱ्होली)
- अमोल डोळस (दिघी – गवळीनगर – गव्हाणे वस्ती)
- शिवराज सुदाम लांडगे (धावडे वस्ती – इंद्रायणीनगर – नेहरूनगर)

> पिंपरी चिंचवड शहरातील भारतीय जनता पार्टीच्या संघटनेला या निवडीमुळे एक नवीन दिशा मिळेल, तसेच, नवीन अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक मजबूत होईल आणि जनतेच्या समस्यांवर अधिक प्रभावीपणे काम करेल,
>
> **- शंकर जगताप , आमदार, भाजपा**

# पवना नदीवरील एसटीपीबाबत प्रतीक्षा कायम

## शासनाच्या मंजुरीनंतर प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे, मात्र, अद्याप त्या बाबत शासनाचा निर्णय न आल्याने एसटीपीबाबत प्रतीक्षा कायम आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

नद्यांचे पात्र प्रदुषणमुक्त करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) सकारात्मक पावले टाकली आहेत. पवना नदीला प्रदुषणाच्या विळख्यातून सोडविण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठीचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. शासनाच्या मंजुरीनंतर प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे. मात्र, अद्याप त्या बाबत शासनाचा निर्णय न आल्याने एसटीपीबाबत प्रतीक्षा कायम आहे.

पवना नदी पात्राला प्रदुषणाचा विळखा आहे. वाढत्या प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रदुषणमुक्तीसाठी स्वयंसेवी संस्था, शासन प्रयत्न करीत आहे. मात्र, त्याला गती देणे अपेक्षित आहे. महापालिकेने चिखली, बोपखेल आणि पिंपळे निलख या ठिकाणी एसटीपी प्रकल्प उभारण्यासाठी प्राधान्य दिले आहे. १०५ एमएलडीचे एसटीपी प्रकल्प ताथवडे, मामुर्डी, किवळे आदीसह विविध ठिकाणी हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. आता पीएमआरडीए प्रशासन देखील त्यासाठी आग्रही आहे.

पीएमआरडीएच्या हद्दीतील नदी पात्रालगत एसटीपी प्रकल्प उभारण्याचे नियोजन पीएमआरडीए प्रशासनाने केले आहे. त्याचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात आला आहे. २०१९ पासून त्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. मात्र, अद्याप शासनाकडून सकारात्मकता दर्शविण्यात आली नाही. शासनाने प्रस्तावाला मंजूरी दिल्यास एसटीपी प्रकल्पाद्वारे नद्यांचे पात्र प्रदुषणमुक्त करण्यास मदत होणार आहे.

### आढावा घेतला कार्यवाही नाही

» पर्यावरण विभागाच्या सचिवांच्या उपस्थितीत २८ मार्च रोजी व्हीडिओ कॉन्फरन्सवर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी सहभागी झाले होते. या वेळी तिन्ही कार्यालयाकडून पवना नदीवरील एसटीपी प्रकल्पाची माहिती देण्यात आली आहे. मात्र, त्यानंतरही पीएमआरडीएच्या प्रस्तावावर विचार झालेला नसल्याची स्थिती आहे.

### 197 कोटी खर्चाची तरतूद

» पीएमआरडीएच्या हद्दीत ३५ किलोमीटरपर्यंत पवना नदीच्या पात्राचा समावेश होतो. पात्रालगत विविध ठिकाणी १५ एसटीपी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १९७ कोटी रुपये खर्च होणार आहे.

> राज्य शासनाकडे आपण प्रस्ताव पाठविला आहे. अद्याप त्यांच्याकडून पुढील कार्यवाही झालेली नाही. त्यांच्याकडून सुचना आल्यानंतर पुढे कामाला गती देऊ.
>
> **- योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए**

# पुरंदर विमानतळासाठी ड्रोन सर्वेक्षण

## शेतकऱ्यांची संमिश्र प्रतिक्रिया; दहा दिवसांत होणार सुरुवात, प्रशासन देणार पूर्वसूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी होणाऱ्या संयुक्त भूमापनासाठी ड्रोनचा वापर आता पुढील दहा दिवसांत सुरू होणार असल्याचे पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे. यापूर्वी ९ एप्रिलपासून ड्रोन सर्वेक्षण सुरू होईल असे सांगण्यात आले होते, मात्र आता हे वेळापत्रक सुधारण्यात आले आहे.

पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी होणाऱ्या संयुक्त भूमापनासाठी ड्रोनचा वापर आता पुढील दहा दिवसांत सुरू होणार असल्याचे पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे. यापूर्वी ९ एप्रिलपासून ड्रोन सर्वेक्षण सुरू होईल असे सांगण्यात आले होते, मात्र आता हे वेळापत्रक सुधारण्यात आले आहे. सर्वेक्षण सुरू करण्यापूर्वी संबंधित गावांतील शेतकऱ्यांना पूर्वसूचना दिली जाईल, असे दुडी यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनानुसार, ड्रोन सर्वेक्षण आणि भूमापन एकाचवेळी होणार आहे. राज्य सरकारने पुरंदर तालुक्यातील वाणपुरी, उडाचीवाडी, कुंभारवळण, एकहातपूर, मुळजवडी, खानवडी आणि पारगाव ही सात गावे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी निश्चित केली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही हे विमानतळ या गावांमध्येच होईल, असे जाहीर केले आहे.

जमीन संपादन प्रक्रियेपूर्वी प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत सार्वजनिक सल्लामसलत बैठकांचे आयोजन केले होते. सुरुवातीला दोन गावांमध्ये चर्चा झाली, मात्र त्यानंतर सातही गावांतील ग्रामस्थांनी एकत्र येऊन सासवड येथे आंदोलन केले. उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे यांच्या मध्यस्थीमुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले. तरीही अनेक शेतकरी अजूनही साशंक आहेत आणि पुढील बैठकींमध्ये सहभाग घेतलेला नाही. ड्रोन तंत्रज्ञानामुळे जमिनीचा प्रकार व विद्यमान सुविधा याचे स्पष्ट चित्र मिळेल, असे जिल्हाधिकारी डूडी यांनी सांगितले. मात्र अद्याप जिल्हा प्रशासनाला ड्रोन उड्डाणासाठी अधिकृत आदेश प्राप्त झालेले नाहीत.



### ड्रोन उडताना पाहून अस्वस्थता

» संबंधित शेतकऱ्यांना लवकरच नोटीस देण्यात येणार असून, पारगाव गावात बुधवारी रात्री ४-५ ड्रोन उडताना आढळल्याचे वृत्त समोर आले. त्यामुळे गावात काही काळ अस्वस्थता पसरली. दुसऱ्या दिवशी एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. मात्र, प्रशासनाने या मृत्यूचा ड्रोन उड्डाणाशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. ड्रोन तंत्रज्ञानामुळे जमिनीचा प्रकार व विद्यमान सुविधा याचे स्पष्ट चित्र मिळेल, असे जिल्हाधिकारी डूडी यांनी सांगितले. मात्र अद्याप जिल्हा प्रशासनाला ड्रोन उड्डाणासाठी अधिकृत आदेश प्राप्त झालेले नाहीत.

### प्रशासन देणार पूर्वसूचना

» सातही गावांमध्ये परिस्थिती तणावपूर्ण असून, शेतकऱ्यांचा विरोध कायम आहे. सरकारने प्रक्रिया पुढे नेण्यास सुरुवात केली असली, तरी शेतकऱ्यांचा प्रतिकार हा पुढील टप्प्यांमध्ये अडथळा ठरू शकतो. ड्रोन सर्वेक्षण आणि भूमापन दिवसाच्या वेळेतच केले जाईल आणि याआधी सर्व शेतकऱ्यांना कळवले जाईल, असे जिल्हाधिकारी दुडी यांनी स्पष्ट केले.

### ड्रोनच्या सहाय्याने अचूक भू-नकाशे

» प्रशासन आता ड्रोनच्या सहाय्याने अचूक भू-नकाशे तयार करण्याच्या तयारीत आहे. यामध्ये सिंचनयोग्य व असिंचन जमीन, झाडांची संख्या, विहिरी, तसेच निवासी बांधकामे यांची नोंद घेतली जाणार आहे. या सर्वेक्षणासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) भूमापन विभागाकडे ४.८६ कोटी रुपये जमा केले आहेत.

# गावरान आंब्याची चव दुर्मिळ गावरान आमराया नामशेष होण्याच्या मार्गावर

## शेतकऱ्यानी गावरान आंब्याची झाडे तोडून संकरित व कलमी आंब्यांची लागवड केल्याने पारंपरिक गावरान आंब्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

कधीकाळी घराघरात दरवळणारा गावरान आंब्याचा सुगंध, आता इंदापूर तालुक्यात दुर्मिळ होत चालला आहे. उत्पन्न वाढवण्याच्या लालसेने शेतकऱ्यांनी गावरान आंब्याची झाडे तोडून संकरित व कलमी आंब्यांची लागवड केल्याने पारंपरिक गावरान आंब्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे. परिणामी गावरान आंब्याची चव व सुगंध दोन्ही हरवत चालले आहेत.

पूर्वी इंदापूर तालुक्यातील प्रत्येक गावात, प्रत्येक शेतात गावरान आंब्याची पन्नास ते शंभर झाडे सहज आढळत असत. आजी-आजोबांनी लावलेली किंवा नैसर्गिकरीत्या उगवलेली ही झाडे आमरायांना देखणं रूप देत असत; मात्र गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी गावरान झाडांची मोठ्या प्रमाणावर तोड केली. झाडांच्या खाली पिके वाढत नसल्यामुळे व अधिक उत्पन्न देणाऱ्या कलमी जातींच्या झाडांना पसंती मिळाल्यामुळे ही वृक्षतोड वेगाने झाली आहे.

पूर्वी वादळी वाऱ्यानंतर मुले पिशव्या घेऊन आमरायात धाव घेत व गावरान आंब्यांचा पाड वेचण्याचा आनंद लुटत. घरोघरी गव्हाच्या काडावर किंवा भूशावर आंबे पिकवले जात, आणि त्या आंब्यांचा गंध घरात दरवळत असे. पाहुण्यांच्या स्वागतासाठी बादलीभर पाणी आणि टोपलीभर आंब्यांची व्यवस्था केली जात होती; परंतु आज बाजारातून शंभर ते दीडशे रुपये किलो दराने आंबे विकत घेऊन पाहुणचार करावा लागतो.

गावरान आंब्याच्या वृक्षतोडीमुळे शेंद्या, शेप्या, दश्या, तोतापुरी यांसारख्या स्थानिक व पारंपरिक जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. सध्या बाजारात हापूस, केशर, नीलम, दशेरी या संकरित जातींना ग्राहकांकडून अधिक पसंती मिळत आहे. कलमी आंबे झटपट पिकवण्यासाठी रासायनिक पद्धतींचा वापर होत असल्याने त्यांच्या चवित व गुणवत्ता टिकवण्यात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोग्याच्या दृष्टीने नैसर्गिकरीत्या पिकवलेला गावरान आंबा अधिक लाभदायक मानला जातो.



### चव आणि आनंद आठवणीपुरतेच

» आजच्या घडीला केवळ गावरान आंब्याची चवच नव्हे, तर पर्यावरणीय समतोल आणि ग्रामीण संस्कृतीशी जोडलेला हा अनमोल वारसाही लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे गावरान आंब्याच्या संवर्धनासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे. पूर्वी थोडा आंबट लागलेला आंबा फेकून दिला जात असे. आज मात्र, रासायनिक प्रक्रियेद्वारे झटपट पिकवलेले आंबे महाग दराने विकत घ्यावे लागतात. त्यामुळे जुन्या काळातील गावरान आंब्याची चव आणि आनंद आता केवळ आठवणीपुरतेच उरले आहेत.